# मनपाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याला माजी नगरसेवकाकडून दमबाजी

## शासकीय कामात अडथळा; पोलिसात गुन्हा दाखल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश बाबुराव राजुरकर (वय ५०, रा. चाणक्य चौक, बुरूडगाव रस्ता) यांना त्यांच्या कर्तव्यावर असताना माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे (रा. माळीवाडा, अहिल्यानगर) याने दमदाटी करत शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी डॉ. राजुरकर यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना गुरूवारी (१७ जुलै) सायंकाळी घडली. तक्रारदार डॉ. राजुरकर हे जुन्या कोर्टाजवळ मनपाच्या आरोग्य विभागाच्या कामावर असताना, बाळासाहेब बोराट हा एक व्यक्तीला सोबत घेऊन घटनास्थळी आला. त्यांनी संबंधित व्यक्तीच्या आजीच्या मृत्यूच्या नोंदीबाबत चर्चा करताना डॉ. राजुरकर यांना 'तुम्ही कामच करत नाही, तुम्ही नोकर आहात हे विसरू नका', अशा शब्दांत दमबाजी केली. डॉ. राजुरकर यांनी बोराटेला प्रशासनाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीची माहिती देऊनही त्याने संतप्त होत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. या प्रकारामुळे डॉ. राजुरकरांनी कोतवाली पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा नोंदवला आहे. दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ आज (शुक्रवार) मनपा कर्मचारी युनियनच्या वतीने मनपा प्रभाग कार्यालय बंद ठेवण्यात येणार असून सकाळी १०:३० वाजता मुख्य प्रशासकीय इमारत येथे सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल, सचिव आनंद वायकर यांनी केले आहे.

# महावितरणच्या अभियंत्याला माजी नगरसेवकाकडून जिवे मारण्याचा प्रयत्न

## जातीवाचक शिवीगाळ; केडगाव उपकेंद्रातील प्रकार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** केडगाव येथील महावितरणच्या उपकेंद्रात कार्यरत असलेले सहाय्यक अभियंता राहुल सिताराम शिलावंत (वय ३५ रा. शाहुनगर, केडगाव) यांच्या अंगावर माजी नगरसेवक मनोज कोतकर याने वाहन घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात शिलावंत यांनी फिर्याद दिली असून मनोज कोतकर याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी राहुल शिलावंत हे महावितरणमध्ये सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत आहेत. बुधवारी (१६ जुलै) सायंकाळी ते त्यांच्या कार्यालयात बसलेले असताना, मनोज कोतकर याने त्यांना फोन करून खंडोबा मंदिर परिसरातील विद्युत वितरण बॉक्सच्या बसवणीबाबत विचारणा केली. शिलावंत यांनी योग्य त्या स्वरूपात उत्तर दिले असतानाही, कोतकर याने रागाच्या भरात फोनवरूनच शिवीगाळ सुरू केली आणि ऑफिसमध्ये थांब, मी येतो असे धमकीवजा बोलून फोन कट केला. सुमारे दहा मिनिटांतच मनोज कोतकर हा पांढऱ्या रंगाच्या इनोव्हा वाहनातून आला आणि वाहन भरधाव वेगात चालवत शिलावंत यांच्यावर चढवण्याचा प्रयत्न केला. त्यांचे सहकारी वैभव निकम व पोपट सातपुते यांनी त्यांना वेळीच बाजूला ओढून वाचवले. त्यानंतर कोतकर याने वाहनातून उतरून शिलावंत यांना जातीवाचक अपशब्द वापरून अपमानित केले व धमकी दिली. या संपूर्ण घटनेनंतर शिलावंत यांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनाक्रम सांगितला आणि दुसऱ्या दिवशी गुरूवारी (१७ जुलै) कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलीस उपअधीक्षक अमोल भारती अधिक तपास करीत आहेत.

# त्याने बोलावल्यावर हॉटेलमध्ये का जायचीस?

## रेपचा आरोप करणाऱ्या महिलेला सुप्रीम कोर्टाने फटकारले

**नवी दिल्ली–** सोशल मीडियावर ओळख, नंतर प्रेमसंबंध, त्यातून शारीरिक संबंध आणि शेवटी फसवणूक अशा घटना अलीकडच्या काळात वाढत आहेत. लग्नाचं आश्वासन देऊन नंतर बलात्काराच्या अशाच एका खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. कोर्टाने आरोपीचा अटकपूर्व जामीन कायम तर ठेवलाच शिवाय आरोप करणाऱ्या महिलेला चांगलेच फटकारले.

बिहारमधील एका विवाहित महिलेने अंकित बर्नवाल या व्यक्तीवर लग्नाचे खोटे आश्वासन देत बलात्कार केल्याचा आरोप करत त्याचा अटकपूर्व जामीन रद्द करण्याची मागणी सुप्रीम कोर्टात केली होती. मात्र, न्यायालयाने बुधवारी (१६ जुलै) ही याचिका फेटाळताना स्पष्ट केलं की, महिलेचं स्वतःचं वर्तनही कायद्यानुसार विचारात घेतलं जाईल. विशेषतः ती एक विवाहित महिला असूनही दुसऱ्या पुरुषाशी संबंध ठेवत असल्यास तिच्यावरही खटला चालवला जाऊ शकतो.

**विवाहबाह्य संबंध ठेवून तू देखील गुन्हा केलाय**

न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केलं की, तू विवाहित आहेस, दोन मुलांची आई आहेस आणि परिपक्कही आहेस. तू विवाहित असूनही कोणत्या नात्यात अडकत आहेस याची तुला पूर्ण जाणीव होती. महिलेच्या वकिलाने सांगितलं, की बर्नवालने अनेक वेळा हॉटेल्स आणि रेस्टहाऊसला बोलावून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. यावर न्यायालयाने संतप्त प्रतिक्रिया देत महिलेला विचारलं, तू त्याच्या सांगण्यावरून वारंवार हॉटेल्समध्ये का जात होतीस? तुला हे चांगलंच माहीत आहे, की विवाहित असूनही विवाहबाह्य संबंध ठेवून तू देखील गुन्हा केला आहेस.

संबंधित महिला आणि बर्नवाल यांची ओळख २०१६ मध्ये सोशल मीडियावर झाली होती. त्यानंतर दोघांचे संबंध वाढले. महिलेने आरोप केला की, बर्नवालच्या दबावामुळे तिने पतीपासून घटस्फोट घेतला. घटस्फोटाच्या पंधरा दिवसांतच तिने बर्नवालला लग्न करण्यास सांगितले. पण, त्याने नकार दिला. त्यामुळे महिलेने बिहार पोलिसांकडे बलात्काराची तक्रार दाखल केली.

घटस्फोट झाल्यानंतर त्यांच्यात कोणतेही शारीरिक संबंध झाले नाहीत, यामुळे पटना उच्च न्यायालयाने बर्नवालला अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीनचा निर्णय कायम ठेवला आहे.

# विधानभवनात जोरदार फ्री स्टाईल हाणामारी

## पडळकर-आव्हाड यांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले; मारहाणीचे विधिमंडळात पडसाद

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यात झालेल्या शिवीगाळीचे प्रकरण ताजे असताना गुरुवारी विधानभवनाच्या इमारतीत या दोघांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार फ्री स्टाईल हाणामारी झाली. भर विधानभवनाती कार्यकर्ते एकमेकांना भिडल्याने याचे पडसाद विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात उमटले. या घटनेची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी विधानसभा अध्यक्ष आणि विधान परीषदेचे सभापती यांना कडक कारवाई करण्याची विनंती केली आहे. तर गोपीनाथ पडळकर यांनी दिलगिरी व्यक्त करत झाल्या प्रकारावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

बुधवारी विधानभवन परिसरात जितेंद्र आव्हाड आणि गोपीनाथ पडळकर यांच्यात शाब्दिक चकमक उडाली होती. पडळकर आपल्या वाहनातून उतरत असताना तिथे आव्हाड उभे होते. त्यामुळे पडळकर यांनी आपल्या वाहनाचा दरवाजा जोरात ढकलला. त्यावरून दोघांमध्ये वाद होऊन प्रकरण शिवीगाळपर्यंत गेले होते. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. बुधवारची ही घटना ताजी असताना त्याचा पुढचा अंक आज विधानभवनात घडला.

संध्याकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास विधानभवनाच्या तळमजल्यावर पडळकर आणि आव्हाड समर्थक नितीन देशमुख समोरासमोर येऊन एकमेकांच्या अंगावर धावून आले. त्यावेळी दोघांमध्ये बाचाबाची होऊन प्रकरण मारामारीवर आले. पडळकर यांच्या कार्यकर्त्याने देशमुख यांच्या शर्टाची कॉलर पकडून त्यांना मारायला सुरुवात केली. त्यावेळी विधानभवनात उपस्थित असलेल्या सुरक्षा रक्षकांनी प्रसंगावधान राखत दोघाना एकमेकांपासून बाजूला केले. मारहाण होत असताना त्याचे मोबाईलवर व्हिडीओ चित्रीकरण झाले. विधान परिषदेत उद्धव ठाकरे गटाच्या अनिल परब तर विधानसभेत शरद पवार गटाच्या रोहित पवार यांनी विधानभवनात घडलेल्या मारहाणीचा मुद्दा उपस्थित केला.

या घटनेबद्दल जितेंद्र आव्हाड यांनी तीव्र संताप व्यक्त केला. विधानसभेत गुंडाना प्रवेश देणार असाल तर आमचे लोक सुरक्षित नाहीत. मी एक्सवर याबाबत पोस्ट केली आहे. त्यानंतर माझ्यावर अश्लाघ्य टीका करण्यात आली. मी सभागृहात भाषण केल्यानंतर मोकळी हवा खाण्यासाठी बाहेर आलो असता माझ्यावर थेट हल्ला करण्यात आला. ते गुंड मलाच मारण्यासाठी आले होते, असा आरोप आव्हाड यांनी केला. दरम्यान, विधानभवनात आज घडलेली घटना दुःख देणारी आहे. झाल्या प्रकाराबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. या घटनेबद्दल आपण उद्या भूमिका स्पष्ट करू, असे गोपीचंद पडळकर म्हणाले.

### आज विधानभवनात घडलेली घटना योग्य नाही

- विधानभवनाचा परिसर विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषदेच्या अखत्यारीत येतो. त्यांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन कारवाई करावी, अशी विनंती मी केली आहे. विधानभवनात मोठ्या प्रमाणात लोक येत असून ते मारामारी करतात. हा प्रकार विधानसभेला शोभणारा नाही.

**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

- गुंडांच्या पोशिंदांवर आणि गुंडांवरती कारवाई केली पाहिजे. मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी यांच्यावर कारवाई करावी. विधानभवन हे पवित्र मंदिर आहे, तिथे अशाप्रकारे मारामारी होत असेल तर हे चुकीचे आहे. लोकप्रतिनिधींना धक्काबुक्की होत असेल, मारहाण होत असेल तर हे चुकीचे आहे. विधानभवन प्रांगणामध्ये एवढा कडेकोट बंदोबस्त असताना हे लोक आतमध्ये कसे आले? यांना प्रवेश पास कुणी दिले?

**–उद्धव ठाकरे**, माजी मुख्यमंत्री

# जड वाहतुकीमुळे रस्त्यास धोका

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** शहरातील कांदा मार्केट, कौसल्यानगर, खिलारी वस्ती आदी परिसरातून वाळू, डबर, मुरूम आदी जड वाहनांची वाहतूक रात्रंदिवस सुरू असून ही वाहतूक बंद करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते राजेंद्र पानसरे यांनी पोलिस विभागाकडे केली आहे.

पोलीसांना दिलेल्या मागणी पत्रात राजेंद्र पानसरे यांनी म्हंटले आहे की, वॉर्ड नं. ६, कांदा मार्केट, कौसल्यानगर, खिलारी वस्ती आदी परिसरातून वाळू डबर, मुरूम आदी जड वाहनांची वाहतूक रात्रंदिवस सुरू असल्यामुळे नगरपालिकेने तयार केलेल्या डांबरी व खडीकरण रस्त्यास मोठे खड्डे पडले आहेत. शिवाय पायी चालणारे नागरीकांना भरधाव वेगात धावणारे वाळू, खडी, मुरूम वाहनापासून धोका निर्माण झाला आहे.

जड वाहने विजय हॉटेलपासून निघून अप्पर पोलिस अधीक्षक यांच्या निवास स्थानासमोरून जोराने जातात. खिलारी वस्तीच्या रस्त्याने लक्ष्मी त्र्यंबक कार्यालयाकडून वाळू आणण्यासाठी जातात आणि वाळू भरून पुन्हा या रस्त्याने बेलापूर रोडकडे जातात. वाळू वाहतुकीचा परवाना ट्रक धारकाकडे असल्यास, त्यांनी मुख्य रस्त्याने भरलेली वाहने नेणे आवश्यक आहे. परंतु, ते छोट्या रस्त्याने धावतात. कांदा मार्केट, खिलारी वस्ती, शेळके आय हॉस्पिटल, कौसल्यानगर परिसरात सकाळी आणि संध्याकाळी जेष्ठ नागरिक, महिला, पुरुष दररोज वॉकिंगसाठी जातात. या परिसरातून वाळूची वाहने जोरात धावतात. त्यामुळे जेष्ठांचे अपघात होण्याची शक्यता आहे. पोलिसांनी या रस्त्याला दररोज पाहणी करून वेगाने धावणाऱ्या वाहनांवर कारवाई करणे गरजेचे आहे. अप्पर पोलिस अधीक्षक निवासस्थानाजवळ बंदोबस्तासाठी पोलिस असतात. त्यांच्यासमोर ही जड वाहने धावत असतानाही पोलिस कर्मचारी कोणतीही कारवाई करत नाहीत. वाहनाची कागदपत्रे, वाहन चालकाचे लायसन्स आणि वाळू डबर वाहतुकीचे परवाने आहेत की, नाहीत याची तपासणी करून जड वाहतुकीस रस्त्यावर जाण्यास मनाई करून मुख्य रस्त्यावर वाहतूक करण्याची सूचना द्यावी, अशी मागणी राजेंद्र पानसरे यांनी केली आहे.

## पान १ वरुन

### एक हजार चौरस फुटांपर्यंतच्या...

याशिवाय कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरण आणि गौण खनिज चोरीविरुद्ध कठोर कारवाईसाठी एसओपी तयार केली जाणार आहे. राज्यात कृत्रिम वाळूच्या उत्पादनाला चालना देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात ५० नवीन क्रशर उभारण्याचे नियोजन आहे. एम-सँडला उद्योगाचा दर्जा देण्यात आला असून यामुळे उद्योगांना सर्व सुविधा उपलब्ध होतील. स्वामित्वधन ४०० रुपये प्रति ब्रासवरून २०० रुपये करण्यात आली आहे. उद्योगमंत्र्यांच्या सहकार्याने जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत बैठका घ्याव्यात, असे आवाहन बावनकुळे यांनी यावेळी केले.

### अनुकंपा नियुक्ती सुधारित धोरण जाहीर

झालेला विलंब क्षमापित करणे. प्रतिक्षासूचीवरील उमेदवार बदलणे. प्रतिक्षासूचीवरील उमेदवाराचे नाव वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्याने वगळल्यास कुटुंबातील अन्य व्यक्तीचे नाव समाविष्ट करणे.

या विविध न्यायालयीन प्रकरणी उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने दिलेल्या न्यायनिर्णयानुसार अनुकंपा नियुक्ती योजना सुधारित करण्यात आली आहे.

२) अनुकंपा नियुक्तीच्या कार्यवाहीतील विलंब अनुकंपा नियुक्तीस विलंब होत असल्याने प्रतिक्षा सूचीतील उमेदवारांची संख्या वाढत आहे. तरी कार्यवाहीतील विलंब टाळण्यासाठी काही तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली.

३) योजनेचे सुलभीकरण आवश्यक सन १९९४ पासून आजपर्यंत वेळोवेळी या विषयाबाबत

एकूण ४५ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे अनुकंपा तत्त्वावर प्रत्यक्ष नियुक्ती देत असताना हे विविध आदेश विचारात घ्यावे लागतात. तरी अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेला सर्व आदेश एकत्रित स्वरुपात मिळावेत यास्तव सर्व आदेशांचे एकत्रिकरण करणे.

**अनुकंपा नियुक्ती कोणत्या परिस्थितीत अनुज्ञेय**

शासकीय सेवेत कार्यरत असताना दिवंगत झाल्यास, त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्यास अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय आहे. तसेच बेपत्ता झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास सक्षम न्यायालयाने मयत घोषित केले असल्यास, त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्यास देखील अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय आहे.

**कोणत्या पदावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय**

गट-क व गट ड मधील ज्या ज्या संवर्गात सरळसेवा नियुक्तीचा मार्ग विहित केला आहेत्या सर्व संवर्गाच्या सरळसेवा कोट्यातील रिक्त पदांवर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय आहे.

अनुकंपा नियुक्तीसाठी कुटुंबातील पात्र सदस्य कुटुंबातील सदस्य प्राधान्यक्रमानुसार अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र राहतील. नियुक्ती द्यावयाची त्याने ना-हरकत नमन्यामध्ये देणे आवश्यक आहे. तसेच वयोमर्यादा १८ वर्षे पूर्ण ते ४५ वर्षे आहे.

**ड संवर्गासाठी**

गट-ड मधील अनेक संवर्गांची पदे ही संबंधित विभागांच्या सुधारीत आकृतिबंधामध्ये बाहय यंत्रणेमधून भरण्याबाबत निर्णय झाला असल्याने, अनुकंपा नियुक्तीसाठी पदे उपलब्ध होत नाहीत. यास्तव, या शासन निर्णयाच्या दिनांकापासून प्रथमतः २ वर्षासाठी, गट-ड च्या सरळसेवा कोट्यातील प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या २०% पदांवर अनुकंपा नियुक्ती देण्याची मर्यादा शिथिल करुन, गट-ड मधील जेवढी पदसंख्या मृत घोषित केली आहे त्या पदसंख्येच्या मर्यादेत अनुकंपा नियुक्तीसाठी पदे पुनर्जीवित करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्यात येत आहेत. शासन निर्णयाच्या दिनांकापासून २ वर्षानंतर गट-ड च्या प्रतिक्षासूचीतील उमेदवारांची संख्या विचारात घेवून मर्यादा शिथिल करण्याबाबत पुनर्विचार करण्यात येईल.

### १५० दिवसांत अनुकंपा नियुक्ती

उपलब्ध रिक्त पदांची परिगणना करणे.

गट-ड मध्ये अनुकंपा नियुक्तीसाठी पदे पुनर्जीवित करण्याचा प्रस्ताव प्रशासकीय विभागास पाठविणे.

- **पूर्व तयारी–** नियुक्ती प्राधिकारी कार्यालयाने सर्व कार्यवाही १५ ऑगस्ट, २०२५ पर्यंत पूर्ण करावी.
- **आढावा बैठक–** जिल्हाधिकारी यांनी १८ ऑगस्ट, २०२५ रोजी सर्व नियुक्ती प्राधिकारी यांची बैठक आयोजित करुन त्यांच्याकडून माहिती संकलित करणे
- **गट-ड ची पदे पुनर्जीवित करणे नियुक्ती–** प्राधिकाऱ्याने जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार गट-ड ची पदे पुनर्जीवित करण्याचा प्रस्ताव प्रशासकीय विभागास पाठविणे.
- **मेळावा घेणे व शिफारस करणे–** जिल्हाधिकारी यांनी १ सप्टेंबर, २०२५ रोजी उमेदवारांचा मेळावा आयोजित करुन उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस करणे. **गट-ड साठी मृत पदे पुनर्जीवित करणे–** नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून प्राप्त प्रस्तावानुसार संबंधित प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिकारात गट-ड ची पदे १ सप्टेंबर, २०२५ पर्यंत पुनर्जीवित करण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

जिल्हाधिकारी कार्यालयाने गट-क च्या पदासाठी शिफारस केलेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करणे.

### गांधी यांच्या ईडी जबाबामुळे...

चौकशीच्या गोपनीय स्वरूपामुळे अधिक खुलासा करण्यास त्यांनी नकार दिला. या ईडी चौकशीमुळे नगर अर्बन बँकेच्या वर्तुळात सध्या प्रचंड हालचाल सुरू असून, अनेक थकबाकीदार, माजी संचालक आणि हितसंबंधित व्यक्तींमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. गांधी यांनी दिलेल्या जबाबामुळे अनेक बड्या राजकीय नेत्यांसह व्यापारी व कर्ज थकवणाऱ्यांची अडचण वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

बँकेच्या कारभारात झालेल्या कथित गैरव्यवहारामुळे शेकडो खातेदारांचे कोट्यवधी रूपये अडकून पडले आहेत. बँक प्रशासनाने ईडीकडे सादर केलेल्या माहितीनुसार, अनेक मोठे थकबाकीदार सततच्या मागणीनंतरही कर्जाची परतफेड करत नाहीत. त्यामुळे आता ईडी या थकबाकीदारांच्या आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. यामध्ये राजकीय व आर्थिक क्षेत्रातील काही प्रभावशाली नावांचा समावेश असल्याची चर्चा आहे. राजेंद्र गांधी यांनी या प्रकरणी पोलिसांत पूर्वीच फिर्याद दिली असून, त्यांच्या फिर्यादीच्या अनुषंगाने आता ईडीने त्यांच्याकडील दस्तऐवजांची तपासणी सुरू केली आहे. या चौकशीदरम्यान त्यांनी सादर केलेली कागदपत्रे आणि मांडलेली निरीक्षणे आता तपासाचा मुख्य आधार ठरणार आहेत.

**हे ही गांधी आणि ते गांधी...!**

नोटा (चलन) यांचा गांधी यांचा जवळचा संबंध आहे. गांधी शिवाय कोणतीच नोटाला (चलन) अर्थ नाही. नगर अर्बन प्रकरणात देखील गांधी यांनाच महत्व आलेले आहे. तक्रारे असणारे राजेंद्र गाधी असून बँकेच्या कार्यकाळाविषयी तक्रार, बँकेचे नुकसान झालेले त्यांचे नावही गांधीच आहे. शिवाय नोटावर (चलनावर) ही गांधी असल्याने अर्बन बँक घोटाळ्यात गांधी नावाला महत्व आले आहे.

### चार दिवसांत अवघ्या पाच हरकती

निवडणुकीच्या तयारीला गती मिळाली असताना इच्छुकांनी देखील गट, गणात नव्याने समाविष्ट झालेल्या गावांचा अभ्यास सुरु केला आहे. नवीन प्रभाग रचनेत अकोले तालुक्यातील लहित खुर्द गावाचा ब्राम्हणवाडा गणात समावेश करण्यात आला. लहित खुर्दचे सरपंच यांनी कोतूळ गणात गावाचा समावेश करण्याची मागणी केली आहे. राहुरी तालुक्यातील गुहा गटाचे नाव बदलून पूर्ववत सात्रळ गट करण्याची मागणी एका तक्रारदाराने केली आहे. नगर तालुक्यातील डोंगरगणचे उपसरपंच यांनी गावाचा जेऊर गटात समावेश न करण्याची मागणी केली आहे. पारनेर तालुक्यातील वडनेर बुद्रुक गाव निघोज गणात घेणे अपेक्षित असताना अळकुटी गणात गेल्याची तक्रार करण्यात आली आहे. तसेच पाठवाडी गाव जवळा गणात घेणे अपेक्षित असताना निघोज गणात गेल्याची तक्रार करण्यात आली आहे.

नागरिकांना २१ जुलैपर्यंत हरकती व सूचना सादर करता येणार आहेत. २८ जुलैपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त हरकतीच्या आधारे अभिप्रायासह विभागीय आयुक्तांना प्रस्ताव सादर करता येणार आहेत. ११ ऑगस्टपर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेऊन निर्णय घेतला जाणार असून १८ ऑगस्टपर्यंत अंतिम प्रभाग रचना मान्यतेसाठी राज्य निवडणूक आयोग किंवा प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडे सादर केली जाणार आहे.

### ॲप माध्यमातून गावागावांतील...

संवाद हे ॲप केंद्र शासनाच्या वतीने क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या सहकार्याने विकसित केलेले आहे. या ॲपमध्ये गावातील स्वच्छता व ग्रामविकासाचे उपक्रम पोस्ट माहिती स्वरूपात शेअर करता येणार आहे. तसेच इतर गावांतील उत्तम कामांची उदाहरणे पाहता येणार आहेत. या ॲपव्दारे सरपंच यांना विषयानुसार संवाद साधता येणार आहे. तसेच पाणी व स्वच्छता विषयक बातम्या व यशोगाथा या ॲपमध्ये उपलब्ध राहणार आहेत. या ठिकाणी ऑनलाईन प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्रही प्राप्त करत येणार आहे. हा उपक्रम सरपंचांना प्रेरणा देणारा संवादाचे नवे व्यासपीठ असून, ग्रामपातळीवरील सर्वांगीण, शाश्वत आणि लोकसहभागातून होणाऱ्या विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे. सरपंचांनी सदरचे मोबाईल https://play.google.com/store/apps/details?id=com.qci.sarpanch_samvaad हे ॲप्लिकेशन डाऊनलोड करून त्याचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन व जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले यांनी केले आहे.

### वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेचं वेळापत्रक जाहीर

**पहिली फेरी–**२१ ते ३० जुलै दरम्यान पहिली फेरी आयोजित केली जाईल. या फेरीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ६ ऑगस्टपर्यंत महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यावा लागेल.

**दुसरी फेरी–** १२ ते २० ऑगस्ट दरम्यान दुसरी फेरी पार पडेल.

**तिसरी फेरी–**३ ते १० सप्टेंबर दरम्यान तिसरी फेरी आयोजित केली जाईल.

**राज्य कोटा प्रवेश प्रक्रिया कधी?**

एनएमसीने सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि संस्थांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, शनिवार, रविवार आणि अन्य सरकारी सुट्ट्यांच्या दिवशीही प्रवेश प्रक्रिया राबवावी. राज्य कोट्यांतर्गत समुपदेशन फेरी ३० जुलैपासून सुरू होईल, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना १२ ऑगस्टपर्यंत महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यावा लागेल.

मुक्त समुपदेशन फेरी २२ ते २९ सप्टेंबर दरम्यान होईल. या सविस्तर वेळापत्रकामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवेश प्रक्रियेची तयारी करण्यास मदत होईल आणि १ सप्टेंबरपासून त्यांचे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होईल.

### कुंभमेळ्यापूर्वी शिर्डी...

व स्ट्रक्चरल डिझाईनची कामे येत्या आठवड्यात पूर्ण करावीत, असे फडणवीस यांनी सांगितले.

शिर्डी विमानतळ हे मुंबई आणि नवी मुंबई विमानतळांच्या जवळचे विमानतळ आहे. येथील लहान विमानांच्या पार्किंगसाठी शिर्डी विमानतळाचा वापर होऊ शकतो. यासाठी शिर्डी विमानतळावर आवश्यक सुविधा उभारण्यासाठी आवश्यक असल्यास अतिरिक्त जमीन संपादित करण्याची प्रक्रिया हाती घ्यावी, अशी सूचना फडणवीस यांनी केली.

या बैठकीत पुरंदर विमानतळ प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला. या प्रकल्पासाठी सर्वेक्षण पूर्ण झाले असून पुणे जिल्हाधिकारी यांनी तातडीने जमीन संपादित करण्याची प्रक्रिया सुरू करावी, जेणेकरून विमानतळाचे काम लवकर सुरू होईल. हे विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर महाराष्ट्रातील विमानसेवा अधिक सक्षम होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### वीज बील लवकरच कमी होणार

वर्षाच्या निधी आणि प्रत्यक्ष दिल्या गेलेल्या निधीमध्ये तफावत निर्माण होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. आवश्यकतेनुसार नियमांमध्ये योग्य बदल करून राज्यातील वीज वितरण व्यवस्थेची आर्थिक स्थिती बळकट करण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना आणि पीएम कुसुम योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी देखील निधीची तातडीने गरज असून, वित्त विभागाने ऊर्जा विभागाकडून आलेल्या मागण्यांचा विचार करावा. सर्वसामान्य वीज ग्राहकांना दिलासा देण्यासाठी वीज दर निश्चित करताना आवश्यक उपाययोजना करणेही महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.